## जत-डफळापुर रस्त्यावरील खड्डे मुजवावे

### बाळासाहेब शिंदे यांची मागणी

**जत : हॅलो प्रभात**



जत ते डफळापूर या रस्त्यावरील खड्डे मुजवावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब शिंदे यांनी जिल्हा परिषद सदस्य सरदार पाटील यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. या दिलेल्या निवेदनात बाळासाहेब शिंदे यांनी म्हटले आहे की, हा महत्त्वाचा रस्ता असून या रस्त्यावरून अनेक वाहने ये जा करतात मात्र रस्त्यावर खड्डे असल्यामुळे वाहनधारकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या रस्त्यावरून विशेष म्हणजे अनेक राजकीय पुढारी ये जा करतात असे असताना हा महत्त्वाचा रस्ता दुर्लक्षित कसा यासाठी नूतन जिल्हा परिषद सदस्य सरदार पाटील यांनी लक्ष घालून त्या रस्त्याची डागडुजी करण्यास भाग पडावे असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. त्याचबरोबर रामपूर वडा या ठिकाणी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे वाढल्यामुळे समोर येणारे वाहन दिसत नाही. ते झाडे तोडावी अशी ही मागणी सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब शिंदे यांनी केली आहे.

# जयसिंगपूरात बालमजुरीचा धक्कादायक प्रकार!

### स्वच्छता कामासाठी अल्पवयीन मुलांकडून काम : ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**जयसिंगपूर : हॅलो प्रभात**

शहरातील स्वच्छता व्यवस्थेत बालमजुरीचा गंभीर प्रकार समोर आला असून जयसिंगपूर नगरपरिषद यांच्या कंत्राटी ठेकेदार विक्रम गायकवाड यांनी अल्पवयीन मुलांकडून सफाईचे काम करून घेत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधित ठेकेदारावर बालमजुरी (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम १९८६ अंतर्गत गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करत जयसिंगपूर पोलिस ठाणे येथे तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे.

मंगळवार (दि.१०) रोजी सकाळच्या सुमारास शहरात एक अल्पवयीन मुलगा कचरा गोळा करून वाहनात भरत असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आले. याबाबत त्याच्याकडे चौकशी केली असता तो नगरपरिषदेचे कंत्राटी ठेकेदार विक्रम गायकवाड यांच्याकडे अनेक दिवसांपासून सफाई कामगार म्हणून काम करत असल्याचे सांगितले.

याचबरोबर शहरात रात्रीच्या वेळी झाडलोट करण्यासाठी दोन अल्पवयीन मुलींकडूनही काम करून घेतले जात असल्याची माहिती पुढे आली आहे.




त्यामुळे नगरपरिषदेच्या स्वच्छता व्यवस्थेतच बालमजुरीचा वापर होत असल्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

बालकांकडून मजुरी करून घेणे हे कायद्याने सक्त मनाई असताना देखील नगरपरिषदेच्या कंत्राटी कामातच अल्पवयीन मुलांचा वापर होत असल्याने शहरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदारावर बालमजुरी प्रतिबंधक कायद्यानुसार तात्काळ गुन्हा दाखल करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, नगरपरिषदेच्या स्वच्छता कंत्राटामध्येच बालमजुरी होत असल्याचा आरोप समोर आल्यानंतर प्रशासनाच्या देखरेखीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणात पोलिस आणि पालिका प्रशासन कोणती कारवाई करणार याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

## अहमदनगरचे नामांतर 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नगर'



**राहुरी : हॅलो प्रभात**

राज्य मंत्रिमंडळाच्या आज (१३ मार्च) झालेल्या बैठकीत अहमदनगर शहराचे नामांतर 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नगर' करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या निर्णयाचे स्वागत करत राहुरी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नगर नामांतर कृती समितीच्या वतीने अहिल्याभवन येथे फटाके फोडून व पेढे वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. नामांतराच्या मागणीसाठी कृती समितीने मागील वर्षी नगर जिल्ह्यात सुमारे १५ दिवसांची नामांतर यात्रा काढून विविध तालुक्यांतील ग्रामपंचायती व संस्थांचे सुमारे ११०० ठराव शासनाकडे पाठवले होते. अखेर या मागणीला यश मिळाल्याने समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून राज्य सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले. यावेळी समितीचे पदाधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गॅस दरवाढविरोधात महिला काँग्रेस व युवक काँग्रेसचे आंदोलन

**कराड : अनिल मोरे**

घरगुती गॅसच्या सतत वाढणाऱ्या दरांमुळे तसेच गॅस टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले असून या विरोधात सातारा जिल्हा महिला काँग्रेस आणि सातारा जिल्हा युवक काँग्रेस यांच्या वतीने कराड येथील तहसील कार्यालयासमोर निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी तहसील कार्यालयासमोर चूल पेटवून प्रतीकात्मक निषेध नोंदवला. गॅस दरवाढ आणि टंचाईविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलकांनी परिसर दणाणून सोडला. वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या घरगुती अर्थसंकल्पावर मोठा परिणाम होत असल्याने गॅसचे दर तात्काळ कमी करावेत आणि नियमित पुरवठा करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

या आंदोलनात महिला काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुष्मा राजे घोरपडे, सातारा जिल्हा युवक



काँग्रेस अध्यक्ष राहुलराज पवार, कराड दक्षिण महिला अध्यक्ष वैशाली जाधव, विद्यार्थी काँग्रेस जिल्हाध्यक्ष मुबीन बागवान, कराड शहर अध्यक्ष मारुलकर ताई, सातारा जिल्हा युवक काँग्रेस सोशल मीडिया अध्यक्ष दिग्विजय जमाले, पाटण तालुका अध्यक्ष रेखा मोरे, सिनेट सदस्य अमित जाधव, माजी कराड शहर अध्यक्ष अशोक पाटील, माजी अध्यक्ष अर्चना पाटील, गौरी चव्हाण, प्राची ताकतोडे, दिग्विजय सूर्यवंशी, धनश्री महाडिक, साहिल तांबोळी, अक्षय सुर्वे, समीर इनामदार, शाहरुख मुल्ला, नवतेज पवार, चैतन्य पाटील, मयूर पाटील, शोभा गोळे, सुरज वेटम, अनिता जाधव, अंजुम पठाण, किरण आडवे, कराड उत्तर अध्यक्ष सारिका सूर्यवंशी, सविता काकडे, वैभवी पाटील, किरण ताई पाटील, सविता धारे, संगीता सिंगल, शकुंतला कारंडे, वैशाली तुपे, मंगला गोदे, अक्काताई तुपे, गीता आपटे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यावेळी आंदोलकांनी सरकारने तात्काळ गॅस दर कमी करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही दिला.

## ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रा १८ ते २२ मार्चदरम्यान

**जयसिंगपूर : हॅलो प्रभात**

### धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर देवाची वार्षिक यात्रा १८ ते २२ मार्च या कालावधीत पाच दिवस मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. यात्रेनिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शहरात सध्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

श्री सिद्धराज देवालय ट्रस्ट, हमाल-गाडीवान मजदूर संघ, गुमास्ता संघटना आणि जयसिंगपूर नगर परिषद यांच्या सहकार्याने दरवर्षीप्रमाणे गुढीपाडवा निमित्त ही यात्रा आयोजित केली जाते.यात्रेची सुरुवात बुधवार, १८ मार्च रोजी सकाळी ६ वाजता श्रींच्या अभिषेक व महापूजेद्वारे होणार आहे. सायंकाळी ४ वाजता पालखी मिरवणुकीस प्रारंभ होईल. पारंपरिक प्रथेनुसार पालखी मिरवणुकीवर गुलाल व खारीकची उधळण करण्यात येणार आहे. सायंकाळी ७ वाजता मंदिर प्रांगणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर रात्री भव्य शोभेच्या दारूची आतषबाजी होणार असून रात्री १० वाजता "पैसा माझा असेल पण नशीब माझे नाही" हे कन्नड नाटक सादर केले जाणार आहे.



गुरुवार, १९ मार्च हा यात्रेचा मुख्य दिवस असून दिवसभर भाविकांकडून श्रींचे दर्शन व नैवेद्य अर्पण केले जाणार आहे.शुक्रवार, २० मार्च रोजी पहाटे साडेपाच वाजता महारुद्र यागाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज व श्री स्वामी समर्थ महाराज यांचा हरिहर भेट सोहळा होणार आहे. त्यानंतर रात्री १० वाजता "आता विसाव्याचे क्षण" ही नाटिका तसेच ऑर्केस्ट्रा धमाका कार्यक्रम रंगणार आहे.

शनिवार, २१ मार्च रोजी दुपारी ३ वाजता मोटरसायकल बरोबर म्हैस पळवणे, रेडकू पळवणे तसेच बिगर नंबर म्हैस पळवणे अशा पारंपरिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.यात्रेच्या समारोपाच्या दिवशी, रविवार २२ मार्च रोजी रात्री १० वाजता "बारा गावच्या अप्सरा लावण्य मदन मंजिरी" या २५ नृत्यांगनांच्या बहारदार लावण्यांचा कार्यक्रम सादर केला जाणार आहे.दरम्यान, पाच दिवस चालणाऱ्या या यात्रेच्या तयारीला वेग आला असून सिद्धराज देवालय ट्रस्ट, यात्रा समिती, हमाल-गाडीवान मजदूर संघ, गुमास्ता संघटना तसेच नगर परिषदेचे कर्मचारी व पदाधिकारी यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रयत्नशील आहेत.

## प्रभाग १७ मध्ये पाणीपुरवठा व्यवस्थेचा बोजवारा

### नगरसेवकांचा धरणे आंदोलनाचा इशारा

**अहिल्यानगर : हॅलो प्रभात**

मागील एक महिन्यापासून प्रभाग १७ मधील पाणी पुरवठा व्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. पाणी सुटण्याच्या अनिश्चित वेळा, पाण्याला पुरेसा दाब नसणे, या समस्यांचा नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. येत्या सात दिवसांत प्रभाग १७ मधील विस्कळीत झालेला पाणी पुरवठा सुरळीत न झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता प्रभागातील नागरिकांसह आयुक्तांच्या दालनात बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा या प्रभागाचे नगरसेवक मयूर बांगरे, मनोज कोतकर, कमल कोतकर, आशविनी लोंढे यांनी दिला आहे.

यासंदर्भात आज महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, पाणी सुटण्याची



वेळ निश्चित नसल्याने तसेच अशुध्द पाणी पुरवठा होत असल्याने प्रभागातील नागरिकांचा महापालिका प्रशासनावर प्रचंड रोष निर्माण झाला आहे. मुळा डॅममधून येणारे पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध असून संपूर्ण उन्हाळ्यात पाणी टंचाई जाणवण्याची शक्यता कमी आहे. शहरात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करून महापालिका प्रशासन खासगी टँकर व्यावसायिक आणि वॉटर माफियांचे खिसे गरम करण्याचे काम करीत आहे, असा आरोप करण्यात आला आहे.

## आरजेएस फार्मसीत महिला दिन उत्साहात

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



आरजेएस फार्मसी कॉलेज, आरजेएस ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स व एसजेएस हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी केक कापून तसेच संस्थेतील महिला प्राध्यापक व एसजेएस हॉस्पिटलच्या महिला कर्मचाऱ्यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

हा कार्यक्रम संस्थेच्या अध्यक्षा बेबीताई कातकडे व सचिव पूजा कातकडे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी 'Give To Gain' या अभियानाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थिनींच्या सुरक्षितता व आरोग्य जनजागृतीसाठी कराटे व योगा सत्राचे आयोजन करण्यात आले. प्रा. सुरेखा भवर यांनी कराटे व योगाचे प्रात्यक्षिक देत स्वसंरक्षणाबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विद्यार्थिनींनी मनोगत व कविता सादर केली. यानंतर म्युझिकल चेअर, झुंबा डान्स आदी मनोरंजनात्मक उपक्रमही घेण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी गोरे व सानिका शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. कावेरी चौधरी, प्रा. उत्कर्षा लासुरे व सर्व प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. तसेच संस्थेचे पदाधिकारी व मान्यवरांनी उपक्रमाचे कौतुक केले.

## 'डीकेटीई'च्या विद्यार्थ्यांची प्रकल्प स्पर्धेत चमकदार कामगिरी

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**



अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व सृजन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय अभियांत्रिकी प्रकल्प प्रदर्शन डिपेक्स २०२६ मध्ये डीकेटीईच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला. पारितोषिक कुलगुरु प्रा. डॉ. कारभारी काळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

डीकेटीईच्या मेकॅनिकल विभागातील पार्थ व्हनवाडे, पार्श्व पाटील, सुमित सदलगे, प्रमोद कांबळे आणि संकेत संकपाळ यांनी 'निरुपयोगी कागदाचा वापर करून पर्यावरणपूरक जैवविघटनशील मल्चिंग पेपर' हा अभिनव प्रकल्प सादर करून परीक्षकांची दाद मिळवली.

हा प्रकल्प प्लास्टिक मल्चमुळे शेतीत निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय समस्येचा पर्याय ठरतो. त्यात टाकावू कागद आणि नैसर्गिक कृषी तंतू वापरून जैवविघटनशील मल्चिंग पेपर विकसित करण्यात आला आहे, जो पीकांच्या वाढीच्या कालावधीत ताकद, लवचिकता व आर्द्रता टिकवतो आणि नंतर नैसर्गिकरित्या विघटीत होऊन मातीची गुणवत्ता राखतो.

संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाशआण्णा आवाडे, मानद सचिव डॉ. सपना आवाडे व कार्यकारी संचालक रवी आवाडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रकल्पासाठी प्रा. डॉ. सौ. एल.एस. आडमुठे, विभागप्रमुख डॉ. व्ही.आर. नाईक व मार्गदर्शक डॉ. जी.सी. मेकळके यांनी मार्गदर्शन केले.

# 'दत्त' कारखान्याची ऊस बिले एकरक्कमी आदा

### गणपतराव पाटील ; कारखान्याने ऊस दराबाबतची विश्वासाहर्ता जोपासली

**शिरोळ : हॅलो प्रभात**

श्री दत्त साखर कारखाना, शिरोळ यांनी कायमच शेतकऱ्यांची ऊस बिले एकरक्कमी विना कपात आदा करून ऊस दरावरील विश्वास कायम ठेवला आहे. यावर्षीच्या गळीत हंगामात कारखान्याने एकूण ११,७८,७०५ मे.टन उसाचे गाळप केले असून १२.३५% साखर उतारा मिळवून १२,८५,९७० क्विंटल साखर उत्पादन केले आहे.

केंद्र शासनाच्या एफआरपी धोरणानुसार गाळपास उपलब्ध असलेल्या उसास प्रति टन रुपये ३,३७८ देय होते; परंतु कारखान्याने शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रति टन रुपये ३,४५० देण्याचे ठरवले. ह्या प्रमाणे एकूण ₹४०६ कोटी ६५ लाख ३२ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आले असून, १००% रक्कम वेळेवर दिली गेली आहे, असे मार्गदर्शक संचालक उद्यान पंडित श्री गणपतराव पाटील यांनी माहिती दिली.



कारखाना शेतकऱ्यांची ऊस शेती आर्थिक दृष्ट्या किफायतशीर व्हावी या उद्देशाने ऊस विकास योजनेअंतर्गत विविध उपक्रम राबवतो. या उपक्रमांतर्गत सहभागी क्षेत्राची एकरी उत्पादकता उत्कृष्ट असल्याने शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त सहभागी व्हावे, तसेच येणाऱ्या गळीत हंगामात जास्तीत जास्त ऊस गाळपाकरता कारखान्याकडे द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

पत्रकार परिषदेला कारखान्याचे चेअरमन रघुनाथ पाटील, व्हा.चेअरमन शरदचंद्र पाठक, संचालक अनिलराव यादव, दरगु गावडे, प्रमोद पाटील, शेखर पाटील, कार्यकारी संचालक एम व्ही पाटील व सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

## अभियांत्रिकी क्षेत्रातील तरुणाई देशाला अव्वल स्थानी घेऊन जाईल : प्रा.संजय ठिगळे

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**




२१ व्या शतकातील तरुणाई ही माहिती व तंत्रज्ञानाच्या अश्वावर आरूढ झाली असून तंत्र,मंत्र आणि यंत्राच्या सहाय्याने ती भारताला जगात अव्वल स्थानावर घेऊन जाईल.मात्र त्यासाठी गरज आहे जाज्वल्य देश प्रेमाची आणि आपण ज्या समाजातून आलो त्या समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेची. असे प्रतिपादन जेष्ठ लेखक आणि अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा.संजय ठिगळे यांनी व्यक्त केले.

कोल्हापूर येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेह संमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ लेखक आणि अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा.संजय ठिगळे होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नितीन सोनजे यांनी भूषविले.

प्रारंभी उपस्थितांचे स्वागत यश डोईजड यांनी केले. या प्रसंगी विविध विभागाचे वार्षिक अहवाल प्रा.व्ही.एन.कणके यांनी सादर केले. स्नेह संमेलन प्रसंगी कला,क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्रा. संजय ठिगळे म्हणाले की, अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा फक्त बुद्ध्यांक चांगला असून चालत नाही त्याच्या जोडीला भावनांकही जास्त असला पाहिजे. अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ.नितीन सोनजे म्हणाले की, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात जे यश संपादन केले आहे त्याचा मला सार्थ अभिमान वाटतो आहे. एवढेच नव्हे तर इथून पुढच्या काळात महाचिद्यालयाच्या प्रगतीचा आलेख चढता राहील याची खात्री देतो.

उपस्थितांचे आभार सोनाली ढोले यांनी मानले. सूत्रसंचालन राजवर्धन निकम व वेदांती पदघम यांनी केले.प्रा. चैताली प्रभू , प्रा.व्ही.एन.कणके, डॉ.आर.के.सावंत यांनी आयोजन केले. कार्यक्रमास विविध विभागाचे विभाग प्रमुख,सेवक व विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.

## समर्थ व कुणालचे बॅडमिंटन युथ गेम स्पर्धेत यश

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

राजारामबापू इनडोअर स्टेडियमचे कु. समर्थ सावंत आणि कु. कुणाल जेजुरकर यांनी डेरवण येथे झालेल्या राज्यस्तरीय बॅडमिंटन युथ गेम स्पर्धेत झकास कामगिरी करत पदके पटकावली. कु.समर्थ सावंत (१७ वर्षाखालील गट) यांनी रौप्य व १५ वर्षाखालील गटात कास्य पदक पटकावले, तर कु. कुणाल जेजुरकर (१५ वर्षाखालील गट) यांनी रौप्य पदक मिळवले. दोन्ही खेळाडूंना प्रशिक्षक सचिन भिलारे यांचे मार्गदर्शन लाभले.

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील यांनी दोन्ही खेळाडूंना सत्कार केला



आणि भविष्यात कारखान्याचा नांवलौकिक वाढवतील, असा विश्वास व्यक्त केला. बक्षीस वितरण रत्नागिरी जिल्हा पोलीस प्रमुख श्री. बेले व चिपळूण सहाय्यक पोलीस निरीक्षक आबासो पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.